ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २८ | पुणें, बुधवार तारीख ६ जून, १९६२ | अंक ११

## विविध माहिती

**बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांना निवृत्तिवेतन**—भारताचे माजी अध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांना सालीना १५,००० रुपये निवृत्तिवेतन देण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. त्यांना आपली कचेरी चालवितां यावी म्हणून सालीना आणखी १५,००० रुपये देण्यांत येणार आहेत ह्या वर्षासनावरील प्राप्तीकर वजा जातां माजी अध्यक्षांना दरमहा रु. १,००० मिळतील. ह्यासंबंधीचें बिल लवकरच लोकसभेंत मांडण्यांत येईल व तें पुढें होणाऱ्या सर्व अध्यक्षांना लागूं होईल.

**सिगारेट्स व कॅन्सर**- ब्रिटनमध्यें रॉयल कॉलेज ऑफ फिजिशियन्स ह्या संस्थेनें धूम्रपानानें फुप्फुसाचा कॅन्सर होण्याचा संभव असतो असें मत प्रतिपादिलें आहे; परंतु अध्यक्ष नासर ह्यांच्या मतानें तसें नाहीं. अलीकडे तर सिगारेट्स ओढण्याचें त्यांचें प्रमाण वाढलेंच आहे. पं. नेहरू मात्र अलीकडे कमी धूम्रपान करूं लागले आहेत.

**इंदूर शहराचा पाणीपुरवठा**—इंदूर शहरांत राहणाऱ्या लोकांपैकी ५० टक्के लोकांना उन्हाळ्याच्या दिवसांत पाण्याच्या टंचाईला तोंड द्यावें लागतें. शहराचा विस्तार होत असल्यानें पाणीपुरवठ्याचें काम अधिकच बिकट झालें आहे. इंदूरचे मेयर श्री. शुक्ल ह्यांनीं मध्यप्रदेश सरकारकडे पाणीपुरवठ्याच्या कामासाठी पैशाची मागणी केली आहे.

**भिलाई येथील कामगारांना वेतनवाढ**—भिलाई येथील पोलादाच्या कारखान्याचे चालक आणि कामगारसंघ ह्यांच्यांत वेतनवाढीबाबत करार झाला आहे. करारामधील अटींप्रमाणें प्रमाणें २,००० कामगारांच्या वेतनांत वाढ होणार आहे. त्याशिवाय कचेरींत कामें करणाऱ्या नोकरांची कामाची वेळ अर्ध्या तासानें कमी करण्यांत आली आहे. झोतभट्टीखात्यांत काम करणाऱ्या कामगारांचा विशेष फायदा झाला आहे.

**जबलपूर येथें ग्रामीण विद्यापीठ**—जबलपूर येथें ग्रामीण विद्यापीठ काढण्यास सर्वांत अनुकूल परिस्थिति आहे, असें मत राज्याच्या शेतकी मंत्र्यांनीं जाहीर केलें आहे. जबलपूरला शेतकी कॉलेज, गुरांचा दवाखाना, एंजिनिअरिंगची शाळा, इत्यादि सोयी आहेत. त्याशिवाय गृहशास्त्र शिकविण्याची आणि गौळवाडा काढण्याचीहि सोय आहे.

**टागोरांच्या स्मृतीसाठीं नाट्यगृह**—महाराष्ट्र सरकारच्या टागोर शताब्दिसमारंभ-समितीनें टागोरांच्या स्मृतीप्रीत्यर्थ औरंगाबाद येथें एक नाट्यगृह बांधण्याच्या कल्पनेस पाठिंबा दिला आहे. स्मारक म्हणून बांधण्यांत येणारें नाट्यगृह अद्ययावत् पद्धतीचें असेल आणि तें बांधण्यासाठीं १ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**अमेरिकेचें पाकिस्तानला कर्ज**—अमेरिकेनें पाकिस्तानला ४.५ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें आहे. ह्या कर्जावर व्याज घेण्यांत येणार नसून त्याचा विनियोग करून पाकिस्ताननें लोखंडाचा व पोलादाचा माल घ्यावयाचा आहे. उभयता देशांच्या सरकारांनीं करारावर कराची येथें नुकत्याच सह्या केल्या. विवक्षित माल घेण्यासाठी अमेरिका पाकिस्तानला आणखी कर्जे देणार आहे. त्यामधील हें पहिलें कर्ज आहे. कर्जाची एकूण रक्कम ५० कोटी डॉलर्स होईल.

**भिक्षा मागणें हा गुन्हा**—पंजाब सरकारनें भिक्षा मागण्यास बंदी करणारा कायदा करण्याचें ठरविलें आहे. राज्याचें कायदा खातें कायद्याचा मसुदा तयार करीत आहे. संकल्पित कायद्याप्रमाणें, भिक्षा मागणें हा गुन्हा ठरविण्यांत येणार असून त्याबद्दल तुरुंगाची शिक्षा ठेवण्यांत येणार आहे. इतर कांहीं राज्यांनीं भिक्षाविरोधी कायदे केल्यापासून पंजाबांतील भिक्षेकऱ्यांची संख्या वाढली आहे.

**भारतीय चित्रपटांवरील बंदी**—पाकिस्तानांतील सिनेमागृहांतून १५ भारतीय चित्रपट दाखविण्यास पाकिस्तान सरकारनें बंदी घातलेली आहे. सरकारच्या ह्या हुकमाविरुद्ध पाकिस्तान फिल्म ट्रस्टचे अध्यक्ष मि. नूर महमद ह्यांनीं पश्चिम पाकिस्तानच्या हायकोर्टांत अर्ज केला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें पाकिस्तान सरकारचा हुकूम सनदशीर नाहीं.

**कांडला येथें रासायनिक कारखाना**—गुजरात राज्यांत कांडला बंदरांत एक मोठा रासायनिक कारखाना काढण्याचें ठरविण्यांत आलें आहे. ह्या कारखान्याचा पायाभरणी समारंभ आंतरराष्ट्रीय व्यापार खात्याचे मंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांच्या हस्तें लवकरच होणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठीं ५० लाख रुपये खर्च येईल.

**रेल्वेगाड्यांवर राडारची मदत**—जपानमधील कांहीं रेल्वेअपघातांत अलीकडे २६० माणसें मरण पावलीं. त्यामुळें वेगानें धावणाऱ्या गाड्यांवर राडारची व्यवस्था करण्याचा विचार जपानचे रेल्वे अधिकारी करीत आहेत. एंजिनाच्या पुढील तीन किलोमीटर रेल्वेमार्गावर असलेला बारीकसारीक अडथळासुद्धां एंजिनच्या ड्रायव्हरला कळविण्याची सोय राडारमुळें होईल.

**हिऱ्यांचें जागतिक उत्पादन**—हिऱ्यांचा व्यापार करणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्यांची १२ वी परिषद व्हिएन्ना येथें भरली होती. परिषदेला ८ देशांचीं प्रतिनिधि मंडळें आलीं होतीं. जगांतील हिऱ्यांचें सध्यांचें वार्षिक उत्पादन २.६ कोटी कॅरट्स आहे. एक कॅरेट वजनाचे हिरे सांपडण्यासाठीं सुमारें २५० टन माती, वाळू अगर खडक ह्यांची तपासणी करावी लागते.

**ब्रह्मदेशांतील हिंदी डॉक्टर्स**—ब्रह्मदेशाच्या सरकारनें परदेशीय डॉक्टर्सना आपल्या नोकरींत घ्यावयाचें नाहीं, असें ठरविलें आहे. ह्या धोरणामुळें ब्रह्मदेशांत काम करीत असलेल्या ३० हिंदी डॉक्टरांना त्यांचा करार संपल्यावर नोटिसा देण्यांत आल्या आहेत. ब्रह्मदेशांतील डॉक्टर्स खेडेगांवीं जाण्यास नाखूष असल्यामुळें १९५२ पासून कांहीं परदेशीय डॉक्टर्स नोकरींत घेण्यांत आले होते. ग्रामीण विभागांत काम करण्याची सक्ती आतां ब्रह्मदेश सरकारनें डॉक्टर लोकांवर केली आहे.


**मासे टिकविण्याचें शिक्षण देणारें केंद्र**—मासे टिकविण्याचें शिक्षण देणारें एक केंद्र मंगलोर येथें काढण्यांत येत आहे. केंद्रासाठी लागणारी यंत्रसामग्री जपानकडून मिळाली असून हिंदी तंत्रज्ञांना शिकविण्यासाठी कांहीं जपानी तज्ज्ञहि लवकरच भारतांत येणार आहेत.

**अमेरिकेंतील टेलिव्हिजन सेटस्**—अमेरिकेंतील घरांतून असलेल्या टेलिफोनच्या संख्येपेक्षा टेलिव्हिजन सेटस्‌ची संख्या अधिक आहे. तथापि, टेलिव्हिजन सेटस्‌पेक्षा रेडिओची संख्या अधिक आहे. अमेरिकेंत ५·३ कोटी घरांपैकी ४·८ कोटी घरांतून रेडिओ आहेत. १९५० सालीं फक्त ५० लाख घरांतून टेलिव्हिजन सेटस् होते. १९६० सालीं त्यांची संख्या ४·५ कोटीपर्यंत वाढली आहे.

**कंपनी कायद्याचें २०५ वें कलम**—कंपनी कायद्याच्या २०५ कलमाप्रमाणें कोठल्याहि कंपनीला सदर कलमांत सांगितल्याप्रमाणें घसाऱ्याची तरतूद केल्याशिवाय नफा जाहीर करतां येत नाहीं अगर तो वांटताहि येत नाहीं. ह्या कलमांतील सर्व तरतूदी करण्याचें बंधन कंपनीच्या चालकांवर असते ह्या गोष्टीकडे लक्ष वेधणारें पत्रक भारत सरकारच्या संबंधित खात्यानें काढलें आहे.

**रेल्वेवर होणारा खर्च**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत रेल्वेवर होणाऱ्या परदेशीय चलनाच्या खर्चांत वाढ करण्यांत आली आहे. ह्या कालांत रेल्वेवर २४९ कोटी रुपयांचें परदेशीय चलन खर्च होईल. कोळशाची वाहतुक अधिक कार्यक्षमतेनें व्हावी म्हणून कांहीं नवे मार्ग बांधण्यांत यावयाचें आहेत. जादा रेल्वेमार्गांची तरतूद करण्यासाठी खर्चांत वाढ करणें भाग पडले.

**अल्जीरियाचें भवितव्य**—ता. १ जुलै १९६२ रोजीं फ्रासच्या अल्जीरिया ह्या वसाहतींत स्वयंनिर्णयाच्या प्रश्नावर मतदान होणार आहे. दरम्यान वसाहतीमधील युरोपियन लोक अल्जीरियांतील मालमत्तेची मोठ्या प्रमाणावर नासधूस करीत आहेत. ह्या वसाहतींत १० लाख युरोपियन्स असून त्यापैकी ७०,००० लोक फ्रान्सला परत येतील असा अंदाज आहे. युरोपियनांनीं केलेल्या अत्याचाराचा बदला घेतला जाण्याची भीति त्यांना वाटत आहे.


आपले ऊंसाचे, हळदीचे अथवा गव्हाचे कोणतेंही पीक असो. त्यासाठीं पाणी पुरवठा मात्र बिनचुक झाला पाहिजे. परंतु त्याबाबत काळजी करण्याचे कारण नाहीं. हे काम किर्लोस्कर पंपिंग सेटस् तत्परतेने पार पाडतात. किर्लोस्कर पंपिंग सेटस्‌ची रचना शास्त्रशुद्ध व मजबूत असल्याने ते वर्षानुवर्षे विनासायास काम देतात. हे सेटस् सरकारी तगाई योजनेखालीही मिळतात. पंपाच्या योग्य निवडीसाठीं तांत्रिक सल्ला मोफत दिला जातो.

सविस्तर माहितीसाठीं आमच्या नजिकच्या अधिकृत विक्रेत्याकडे अथवा आमच्याकडे लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड

किर्लोस्करवाडी, जि. सांगली

STUSA KM 1/61

# अर्थ

बुधवार, ता. ६ जून, १९६२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


### बँकांच्या अधिकाऱ्यांसाठी अभ्यासक्रम

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियातर्फे मुंबईत बँकर्स ट्रेनिंग कॉलेज चालविण्यांत येत असतें. ह्या कॉलेजमध्यें व्यापारी बँकांत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी एक अभ्यासक्रम ठेवण्यांत आला आहे. ह्या अभ्यासक्रमांत, अधिकाऱ्यांना बँकिंगचें व्यावहारिक शिक्षण देण्यांत येत असतें. विशेषत: परदेशीय चलनाच्या व्यवहारासंबंधींच्या व्यावहारिक शिक्षणावर आतां भर देण्यांत येईल. गेल्या कांहीं वर्षांत परदेशीय व्यापार–व्यवहारांत भारतीय बँका अधिकाधिक भाग घेऊं लागल्या आहेत. त्यामुळें ह्या व्यवहाराची माहिती असणाऱ्या नोकरांची गरज जास्त प्रमाणावर भासूं लागली. म्हणून बँकिंगविषयीं भरविण्यांत आलेल्या एका परिसंवादांत बँकांच्या प्रतिनिधींनींच अशा प्रकारच्या अभ्यासक्रमाची शिफारस केली होती. परिसंवादाची योजना कॉलेजनेंच तयार केली होती. कॉलेजमधील अभ्यासक्रम व त्याची उपयुक्तता ह्यांचें मूल्यमापनहि वरील परिसंवादांत करण्यांत आलें. कॉलेजनें आतांपर्यंत १,१७० बँक अधिकाऱ्यांना बँकिंगचें व्यावहारिक शिक्षण दिलें आहे. कोलंबो योजनेप्रमाणें ब्रिटनमधील मिडलँड बँकेनें आपले दोन वरिष्ठ अधिकारी ह्या कामीं साह्य करण्याकरतां पाठविले होते. ह्या अधिकाऱ्यांनीं कॉलेजशीं सहकार्य करून दोन वर्षेपर्यंत आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा दिला. बँकांच्या शाखांचे अधिकारी, शाखांमधील अकौंटंट आणि इतर देखरेख करणारे अधिकारी ह्यांच्यासाठी तीन वेगवेगळे अभ्यासक्रम कॉलेजमध्यें ठेवण्यांत आलेले आहेत. कॉलेजला वसतिगृहाची सोय असून त्यांत एका वेळीं ५२ विद्यार्थ्यांची राहण्याची सोय आहे.

---

### ग्रामीण भागांतील क्षयाविरुद्ध मोहीम

पांचगणी येथील एका खाजगी क्षयरोगाच्या इस्पितळाचा २५ वा वर्धापन दिन मध्यवर्ती सरकारच्या आरोग्यखात्याच्या मंत्री डॉ. सुशिला नायर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. क्षयरोग्यांसाठीं खाजगीरीत्या चालविण्यांत आलेलें हें देशांतील पहिलें इस्पितळ आहे. ह्या प्रसंगीं बोलतांना डॉ. सुशिला नायर म्हणाल्या कीं, भारतामधील क्षयरोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठीं सरकार एक राष्ट्रीय योजना अमलांत आणण्याच्या प्रयत्नांत आहे. तथापि क्षयरोगाविरुद्ध चालवावयाची मोहीम सोपी नाहीं. हिंवतापाची सांथ काबूत ठेवणें तुलनेनें अधिक सोपें आहे. कारण मलेरिया उत्पन्न करणारे डास मारले कीं, बरेचसें काम भागतें. क्षयरोगाच्या जंतूंचें मात्र तसें नाहीं. हे जंतु मनुष्याच्या शरीरांतच ठाण मांडून असतात. अर्थातच त्यांचा नाश करणें अवघड असतें. तरीसुद्धां गेल्या १० वर्षांत क्षयरोगाला प्रतिबंध करण्याचें काम मोठ्या प्रमाणावर करण्यांत आलें आहे. सुमारें १८ कोटी लोकांची क्षयरोगविषयक तपासणी करण्यांत आली. त्याचप्रमाणें ६.५ कोटी लोकांना बी. सी. जी. लस टोंचण्यांत आली. क्षयरोगावर उपचार करणाऱ्या केंद्रांची संख्या वाढून आतां २१० वर आली आहे. क्षयरोग्यांसाठीं ३० हजार खाटांची व्यवस्था करण्यांत आली आहे. ग्रामीण भागांतील लोकांत क्षयरोगाचा प्रसार होऊं नये म्हणून फिरतीं उपचार-केंद्रें स्थापन करण्याचा सरकारचा इरादा आहे. तथापि देशांतील क्षयरोग्यांच्या संख्येच्या मानानें हे प्रयत्न अपुरे पडणार हें उघडच आहे. कारण भारतांत ५० लाख लोकांना क्षयाची भावना झालेली असून १५ लाख लोकांना उघडपणें क्षय झालेला आहे.

---

### निजामाचा ६ कोटी रुपयांचा ट्रस्ट

निजामच्या धर्मादाय ट्रस्टची जिंदगी ५.८३ कोटी रुपये आहे. गरिबांचें दुःखनिवारण, धार्मिक संस्थांना मदत, वैद्यकीय उपचारांची तरतूद, शिक्षणाची वाढ, इत्यादि उद्दिष्टांवर त्यांतून खर्च करतां येतो. १४ जून, १९५४ रोजीं निजामानें ट्रस्ट निर्माण केला, तेव्हां त्याची जिंदगी ४.९० कोटी रुपये होती. 'संस्थानें' खात्याचे तेव्हांचे सेक्रेटरी श्री. व्ही. पी. मेनन ह्यांनीं निजामचें मन वळवून हा ट्रस्ट घडवून आणला. ट्रस्टच्या जिंदगीची बाजारभावानें होणारी किंमत ६.२१ कोटी रुपये आहे. गेल्या वर्षी ट्रस्टला ३३.६४ लक्ष रु. उत्पन्न झालें. ट्रस्टनें २३ लक्ष रु. मदतीदाखल दिले. ट्रस्टनें हैद्राबाद येथें २०० खाटांच्या ऑर्थोपेडिक इस्पितळाच्या बांधणीसाठीं ३० लक्ष रु. दिले आहेत. ह्या ट्रस्टच्या कारभारावर देखरेख करण्याचा व नियंत्रण करण्याचा हक्क आंध्र प्रदेश सरकारनें राखून ठेवला आहे.

---

### दुर्गापूर येथील मिश्र पोलादाचा कारखाना

दुर्गापूर येथें मिश्र पोलादाचा कारखाना काढण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. हा कारखाना सार्वजनिक मालकीच्या क्षेत्रांत स्थापन करण्यांत येणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठीं २० कोटी रुपयांची यंत्रसामग्री लागणार असून त्यासाठीं परदेशांतील कंपन्यांकडून टेंडर्स मागविण्यांत आलीं आहेत. कारखान्यांत बसविण्यांत येणाऱ्या यंत्रसामग्रीच्या साह्यानें दरसाल ५० हजार टन मिश्र पोलाद तयार करतां येईल. कारखान्यासाठीं लागणारी जमीन, वसाहत आणि इतर सोयी ह्यांची किंमत सोडून कारखान्याला ३८ कोटी रुपये खर्च येईल असा मूळचा अंदाज होता. परंतु नव्या अंदाजाप्रमाणें खर्चांत ४ ते ५ कोटी रुपयांची वाढ होणार असून एकूण खर्च ५० कोटीपेक्षाहि थोडा अधिक होण्याचा संभव आहे.

---

### हिंदी स्त्रियांची गुलाम म्हणून विक्री !

इराणच्या आखाताच्या आसपासच्या शेखांचे मुलखाकडे कोणत्याहि स्त्रिया नेण्याची हिंदी व्यापाऱ्यांवर बंदी घालण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. हे व्यापारी ( ते बहुसंख्य मुसलमान असतात ) इथें विवाह करून सपत्निक तिकडे जातात आणि तेथें पत्नींना गुलाम म्हणून विकून टाकतात !

---

## भारत सरकारच्या सार्वजनिक कर्जांत चालू वर्षी ६३८ कोटींची वाढ

भारताला एकूण सार्वजनिक कर्ज ३१ मार्च, १९६२ रोजीं ५,२५६·६ कोटी रु. होतें. म्हणजे, ३१ मार्च, १९६१ च्या मानानें तें ३०५·८ कोटी रु. नीं वाढलें. ३१ मार्च, १९६२ अखेरच्या सार्वजनिक कर्जापैकी अंतर्गत कर्जाची रक्कम ४,१६६·१ कोटी रु. असून बाहेरील कर्जाची रक्कम १,०८९·९ कोटी रु. आहे. १९६२–६३ मध्यें सार्वजनिक कर्जांत ६३८·१ कोटी रु. ची वाढ होऊन तें ५,८९४·१ कोटी रु. वर जाईल, अशी अपेक्षा आहे. इतर देणींहि विचारांत घेतां, सर्वसाधारण परिस्थिति खालीलप्रमाणें आहे:—

### भारत सरकारची कर्जविषयक परिस्थिति

(आंकडे कोटी रु. चे)

| | ३१ मार्च १९६१ | ३१ मार्च १९६२ | ३१ मार्च १९६३ |
|---|---|---|---|
| चालू कर्जें ... | २५७२·२१ | २६८८·१३ | २७६५·३९ |
| ट्रेझरी बिलें ... | १२६२·६० | ११८२·३० | १३३२·३० |
| खास तरतीं कर्जें ... | २७२·४६ | २७७·६३ | २७७·६५ |
| मुदत भरलेलीं कर्जें ... | १७·३६ | १८·०० | १८·५९ |
| **एकूण अंतर्गत कर्ज ...** | **४१२४·६३** | **४१६६·०६** | **४३९३·९३** |
| भारताबाहेरील कर्ज ... | ८४६·२२ | १११०·५५ | १५२०·७७ |
| युद्धाला मदत ... | —२०·६२ | —२०·६२ | —२०·६२ |
| **एकूण सार्वजनिक कर्ज** | **४९५०·२३** | **५२५५·९९** | **५८९४·०८** |
| इतर देणीं* ... | १६२०·२२ | १८३३·६१ | २०४२·६९ |
| **एकूण कर्ज ...** | **६५७०·४५** | **७०८९·६०** | **७९७६·७७** |

* पी. आय. ४८० कौंटर फंड, वेगवेगळे प्रॉव्हिडंड फंड, अल्पबचत, रेल्वे–पोस्ट–तार इ. चे घसारा व इतर फंड, इन्‌कम टॅक्स–सुपरटॅक्सच्या आगाऊ भरलेल्या रकमा, इत्यादींचा ह्यांत समावेश होतो.

ज्या कर्जावर भारत सरकारला व्याज भरावें लागतें, अशा कर्जाची रक्कम ३१ मार्च, १९६२ रोजीं ६,७९३ कोटी रु. होती; ३१ मार्च १९६३ रोजीं ती ७,६८०·५ कोटी रु. होईल. ह्याच्या उलट, व्याज मिळणारी सरकारची जिंदगी ३१ मार्च, १९६२ रोजीं ५,६९६·७ कोटी रुपये होती ती ३१ मार्च १९६३ अखेर ६,३९५·९ कोटी रु. होईल.

### हुगळी नदीवर नवा पूल होणार?

हुगळी नदीवर सुप्रसिद्ध हौरा पूल आहे. ह्या पुलाच्या दक्षिणेला सुमारें एक मैल अंतरावर आणखी एक पूल बांधण्याची शक्यता सध्यां अजमावण्यांत येत आहे. ह्या कामाची तांत्रिक पाहणी करण्यासाठी जागतिक बँकेनें ११५ हजार डॉलर्स अथवा ५,७५,००० रुपये मंजूर केले आहेत. सध्याच्या हौरा पुलावर वाहतुकीचा अतिशय ताण पडत आहे. कलकत्ता मेट्रोपॉलिटन प्लॅनिंग ऑर्गनायझेशन ह्या संघटनेनें पुलावरील वहातुकीसंबंधीं केलेल्या अंदाजाप्रमाणें हौरा पुलावरून रोज ५,१०,००० माणसें जातात. त्याशिवाय वेगानें जाणारीं ४०,००० वाहनें दररोज ह्या पुलाचा उपयोग करतात. पश्चिम बंगाल सरकारनें नव्या पुलाची पाहणी करण्यासाठी एका ब्रिटिश एंजिनिअरिंग कंपनीबरोबर करार केलेला आहे. कंपनीच्या तज्ज्ञांनी चालू वर्षअखेर आपला अहवाल सादर करावयाचा आहे.

## अकराशेंच्या नोटा लांबविल्या

### औरंगाबाद येथील महाराष्ट्र बँकेंतील प्रकार

औरंगाबाद येथील सराफा–रोडवरील महाराष्ट्र बँकेच्या शाखेंत नुकताच एक प्रकार घडला. अब्दुल अजीज अहमद नांवाचे एक गृहस्थ आपल्या वाड्यांतील भाडेकरू रहीमुद्दीन याला बरोबर घेऊन बँकेंत गेले. तेथें त्यांनीं मोड भरती करून शंभराच्या नोटा घेतल्या. अकराशें (११००) रुपयांच्या या नोटा घेऊन ते काऊंटर जवळून बोलत बोलत सरकले तेव्हां बरोबर असलेल्या रहीमुद्दीननें त्यांच्या हातांतून नोटांचें बंडल सहज घ्यावें तसें घेतलें व तो तडकाफडकीनें बँकेच्या बाहेर पळाला. बाहेरचीच एक सायकल घेऊन पसारहि झाला. आरडाओरडा करून लोक मागें धावले. पण रहीमुद्दीन दिसेनासा झाला होता. त्यानें लगेच जाऊन एक टॅक्सी ठरविली व स्वतःच्या घरीं जाऊन आपल्या पत्नीला घेऊन त्यानें तात्काळ औरंगाबाद सोडलें. तो पुण्याकडे गेला कीं नगरकडे किंवा बीड–सोलापूरकडे गेला, याचा कांहींच अंदाज लागला नाहीं. पोलिसांनीं धावपळ करून पाठलाग करण्याचा आटोकाट प्रयत्न केला; पण रहीमुद्दीन गेला तो गेलाच. इं. पि. कोडच्या ५०६ कलमान्वयें गुन्हा दाखल करून पोलिसांनीं कार्यवाही सुरू केली आहे. तपास चालू आहे.

### सिमेंटच्या उत्पादनाचें लक्ष्य वाढविलें

भारत सरकारच्या पोलाद व अवजड उद्योगधंद्याच्या खात्यानें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील सिमेंटच्या उत्पादनाच्या लक्ष्यांत वाढ करण्याची सूचना नियोजन समितीला केली होती. नियोजन समितीनें ह्या सूचनेला मंजुरी दिली असून सिमेंटच्या उत्पादनाचें लक्ष्य आतां १·५ कोटी ऐवजी १·८५ कोटी टन ठरविण्यांत आलें आहे. तथापि प्रत्यक्ष उत्पादन इतकें होईल असें मात्र नाहीं. १९६५–६६ अखेर प्रत्यक्ष उत्पादन १·३ कोटी टन होईल असा अंदाज होता. नव्या अंदाजाप्रमाणें प्रत्यक्ष उत्पादन १·६५ कोटी टन होईल. सिमेंटच्या उत्पादनवाढीच्या योजनेसाठी परदेशीय चलन, कच्चा माल व भांडवल ह्यांची जरूर आहे. त्याबद्दल संबंधित खातीं लवकरच चर्चा करतील.

### पाकिस्तानचा दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम

पाकिस्तानच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची अमलबजावणी करण्यासाठी १,९०० कोटी रुपये लागतील असा अंदाज प्रथम करण्यांत आला होता. परंतु आतां त्याला २,३०० कोटी रुपये लागतील असें आढळून आलें आहे. येत्या जूनअखेर पाकिस्तानच्या दुसऱ्या कार्यक्रमाचें दुसरें वर्ष पूर्ण होईल. पाकिस्तानच्या आर्थिक समितीची दोन दिवसांची बैठक अध्यक्ष आयुबखान ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. तींत कार्यक्रमासाठी लागणाऱ्या वाढत्या खर्चाला मंजुरी देण्यांत आली. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील पहिल्या वर्षातील कामाचें मूल्यमापनहि समितीच्या बैठकींत करण्यांत आलें. या वर्षांत शेतीचें व औद्योगिक उत्पादन समाधानकारक झालें. परंतु निर्यात व्यापार कमकुवत आढळून आला असें मूल्यमापनांत म्हटलें आहे.

### कितीहि बायका केल्या, तरी सरकारमान्य एकच

घाना देशांत बहुपत्निकत्वाची पद्धत असली, तरी ह्यापुढें तेथील पुरुषाला एकच अधिकृत पत्नी असूं शकेल. हव्या तेवढ्या किंवा परवडतील तेवढ्या स्त्रियांशीं विवाह करूं पाहणारे आणि एकपत्निकत्वाचा आग्रह धरणाऱ्या स्त्रियांच्या संस्था, ह्यांचा सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न करण्यासाठी तेथील सरकारनें एकाच पत्नीला अधिकृत मानण्याचें ठरविलें आहे.

## भारतामधील साबणाचा वाढता खप

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत भारतामधील साबणाचा खप १,३०,००० टनांनीं वाढेल असा अंदाज करण्यांत आला आहे. १९६०–६१ सालांत देशांतील साबणाचा एकूण खप ३,७०,००० टन होता. १९६५–६६ अखेरीस तो ५,००,००० टनाच्या आसपास जाईल. सध्यां भारतांत साबण तयार करणारे ९१ मोठे कारखाने आहेत. त्याशिवाय साबण तयार करणारे छोटेखानी कारखानेहि बरेच आहेत. मोठ्या कारखान्यांपैकी जवळजवळ एक तृतीयांश कारखाने एकट्या महाराष्ट्रांत आहेत. त्याच्या खालोखाल २१ मोठे कारखाने पश्चिम बंगालमध्यें आहेत. राजस्थान, ओरिसा आणि आसाम ह्या राज्यांत साबणाचे संघटित कारखाने नाहींत. उरलेल्या राज्यांतून फारच थोडे कारखाने आहेत. ह्या सर्व कारखान्यांची मिळून उत्पादनक्षमता सुमारें २,५५,११७ टनांच्या जवळपास आहे. मुख्यतः ४ प्रकारचा साबण कारखान्यांतून तयार करण्यांत येतो. कपडे धुण्याचा साबण, अंगाला लावण्याचा साबण, वैद्यकीय कामासाठी लागणारा साबण आणि इतर प्रकारचा साबण. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सर्व प्रकारच्या साबणाच्या उत्पादनांत वाढ झाली. १९५५ सालीं ९९,००० टन साबणाचें उत्पादन करण्यांत आलें होतें. १९६० सालीं १,४०,५१५ टन साबणाचें उत्पादन करण्यांत आलें. ह्या उत्पादनापैकी बराच मोठा भाग धुण्यासाठी वापरण्यांत येणाऱ्या साबणाचा होता. असंघटित व छोट्या कारखान्यांतून बनविला जाणारा साबण संघटित कारखान्यांकडून बनविल्या जाणाऱ्या साबणापेक्षा कमी प्रतीचा असतो. अशा कारखान्यांकडून निर्माण करण्यांत येणाऱ्या साबणाचा अंदाजहि नीटसा करतां येत नाहीं. दुसऱ्या कार्यक्रमांतील उत्पादनासंबंधीं दोन अंदाज करण्यांत आलेले आहेत. एक अंदाज ३,२०,००० टनांचा असून दुसरा ३,३०,००० टनांचा आहे.

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या आरंभीं साबणाचें उत्पादन सुमारें ३,७०,००० टन होतें. भारतांत परदेशीय साबण आयात करूं दिला जात नाहीं. ह्याला अपवाद म्हणजे कांहीं जंतुनाशक साबण. तथापि ह्या प्रकारचे कांहीं साबणहि अलीकडे देशांत तयार होऊं लागले आहेत; किंवा लवकरच तयार होऊं लागतील. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत १,३०,००० टन जादा साबणाचें उत्पादन करण्यांत येणार असून, त्यांपैकी ८०,००० टनांचें उत्पादन मोठ्या संघटित कारखान्यांकडून करण्यांत यावयाचें असून उरलेलें ५०,००० टनांचें उत्पादन छोट्या व ग्रामोद्योगी कारखान्यांकडून करण्यांत यावयाचें आहे. साबणाच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या कच्च्या मालांत वनस्पति तेल, कॉस्टिक सोडा, सुवासिक द्रव्यें, इत्यादींचा अंतर्भाव होतो. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस ५,००,००० टन साबण उत्पादन करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. हें लक्ष्य गांठण्यासाठी २,३०,००० टन तेल व इतर कच्च्या मालाची आवश्यकता आहे. कच्च्या मालापैकी तेल हा पदार्थ अनेक प्रकारचा वापरण्यांत येतो. मोहाचें तेल, खोबऱ्याचें तेल, भुइमुगाचें तेल साबणाच्या उत्पादनांत वापरण्यांत येतें. ह्यांपैकी कांहीं तेलें, साबणाची विरघळण्याची व फेस होण्याची क्रिया चांगली होण्यास पोषक असतात; तर कांहीं तेलें वापरल्यामुळें स्वच्छता अधिक चांगली होते. म्हणून साबण तयार करतांना तेलें वापरण्याच्या बाबतींत कांहींतरी समतोलता ठेवावी लागते. खोबऱ्याचें तेल हें साबण तयार करण्यास वापरतात. त्याचप्रमाणें खाण्याच्या कामींहि वापरतात. त्यामुळें त्याला मागणी जास्त येते आणि तें महाग पडतें. म्हणून साबणाच्या कारखानदारांना अशी शिफारस करण्यांत आली आहे, कीं त्यांनीं साबण तयार करण्यासाठी कमींत कमी खोबरेल तेल वापरावें.

## मिरज स्टेट बँकेच्या सांगोलें शाखेचें उद्घाटन


'पंढरीच्या पायथ्याशीं असलेल्या आपल्या नगरींत आम्ही आपली शाखा आज येथें सुरू करीत आहोंत. यापूर्वी येथें दोन बँकांच्या शाखा आहेत. त्या सहकारी तत्त्वावरच्या असून सहकारी बँक व शेड्यूल्ड बँक यामध्यें कांहीं फरक असतो. सहकारी बँक सभासद नसणारांना कर्ज अथवा कॅश क्रेडिट देऊं शकत नाहीं. तथापि आम्ही दोन लायक जामीनदाराचे जबाबदारीवर व्यापारी वर्गास कॅश क्रेडिट देऊं शकतों व त्याचा फायदा येथील व्यापारी घेतील व गावच्या भरभराटीस हातभार लावतील अशी मी आशा करतों" अशा आशयाचे उद्गार मिरज स्टेट बँकेचे मॅनेजर श्री. शिराळकर यांनीं अक्षयतृतीयेच्या मुहुर्तावर सांगोला येथील शाखेच्या उद्घाटनप्रसंगीं स्वागत करतेवेळीं काढले.

मिरज बँकेची हीं आठवी शाखा असून लवकरच मंगळवेढा व माढा येथेंहि शाखा सुरू करणार आहे. बँकेचें खेळतें भांडवल १ कोट, ४० लाख रुपयांचें आहे.

## इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सला नवा सेक्रेटरी

इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्स, मुंबई, नें सेक्रेटरीच्या जागेसाठी अर्ज मागविले आहेत. जागेचा प्रारंभींचा पगार १,५०० रु. आहे; तो पुढें वाढणारा आहे. अर्जदार पदवीधर असावा; अर्थशास्त्रांत तो प्रवीण असावा; बँकिंग आणि कायदा ह्यांचें त्याला उत्कृष्ट ज्ञान असावें आणि बँकिंगचा प्रत्यक्ष अनुभव असेल तर उत्तम. वय ३५ ते ४५ असावें.

इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सचे सध्यांचे सेक्रेटरी प्रा. एस. जी. पाणंदीकर, हे निवृत्त होत आहेत.

नाद आणि प्रतिनाद

जनतेच्या सोयीखातर, हातीं घेतलेल्या अनेक विकासकार्यांचा खर्च भागविण्याकरितां वेळोवेळीं सरकारतर्फे सादर करण्यांत येणारे कर्जरोखे खरेदी करण्यांत बँका नेहमीं पुढाकार घेतात. या करितां बँकांना आपल्या ठेवींची जरूरी आहे. आपल्याकडून आलेल्या अधिकाधिक ठेवींमुळें

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

अशा कार्येची मदत करण्यांत नेहमीच अग्रगामी राहूं शकेल.

रजिस्टर्ड ऑफिस : ११७७, बुधवार पेठ, पुणें-२. तार : MAHABANK

महाराष्ट्रांत व इतरत्र सर्वत्र बँकेच्या शाखा आहेत.

Alco M.B. 62/

# THE BANK OF

## BALANCE SHEET AS AT

| 31-12-1960 Rs. | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Capital:** | | |
| | *Authorised Capital:* | | |
| 50,00,000 | 1,00,000 Shares of Rs. 50/- each ... | | 50,00,000—00 |
| | *Issued and Subscribed Capital:* | | |
| 40,00,000 | 80,000 Shares of Rs. 50/- each ... | | 40,00,000—00 |
| | *Called and Paid-up Capital:* | | |
| | 80,000 Shares of Rs. 50/- each. | | |
| 32,00,000 | fully paid up ... | 40,00,000—00 | |
| | **Less: Calls in Arrears:** | | |
| Nil | From Directors — Nil | | |
| 14,215 | From others — Rs. 34,690 | 34,690—00 | 39,65,310—00 |
| 31,85,785 | | | |
| 4,32,380 | Share Application Deposit ... | | Nil |
| | **2. Reserve Fund & Other Reserves:** | | |
| 16,10,000 | *Reserve Fund ... | 20,50,000—00 | |
| 50,000 | Contingency Fund ... | 50,000—00 | |
| 40,000 | Industrial Development Fund ... | 80,000—00 | |
| 10,000 | Staff Benefit Fund ... | 20,000—00 | 22,00,000—00 |
| 17,10,000 | | | |
| | *(Includes Rs. 2,52,995/- received as premiums on issue of shares in past years) | | |
| | **3. Deposits and Other Accounts:** | | |
| 6,16,36,899 | Fixed Deposits, Cash Certificates, Recurring Diposits etc. ... | 7,80,90,028—76 | |
| 5,09,49,157 | Savings Bank Deposits ... | 6,75,57,286—84 | |
| 3,80,17,636 | Current Accounts and Contingency Accounts etc. ... | 4,91,85,747—00 | 19,48,33,062—60 |
| 15,06,03,692 | | | |
| | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.:** | | |
| Nil | (i) In India. ... | Nil | |
| Nil | (ii) Outside India. ... | Nil | Nil |
| | **Particulars:** | | |
| Nil | (i) Secured by part of Bank's investment ... | Nil | |
| Nil | (ii) Unsecured. ... | Nil | |
| 16,50,550 | **5. Bills Payable:** ... | | 22,99,661—58 |
| | **6. Bills for Collection, being Bills Receivable as per Contra:** | | |
| 1,25,72,731 | (i) Payable in India. ... | 1,62,45,156—20 | |
| 54,914 | (ii) Payable outside India. ... | 1,82,813—77 | 1,64,27,969—97 |
| | **7. Other Liabilities:** | | |
| 19,499 | Unpaid Dividend ... | 29,293—05 | |
| 336 | Rebate on Bills Discounted ... | 316—48 | |
| 34,10,737 | Branch Adjustments ... | 34,99,625—07 | 35,29,234—60 |
| 34,30,572 | | | |
| 58,74,556 | **8. Acceptances, Endorsements and Other Obligations as per contra:** ... | | 1,22,39,900—49 |
| | **9. Profit and Loss:** | | |
| 3,11,367 | Profit as per last Balance Sheet ... | 3,92,608—80 | |
| | *Less:* Appropriations: | | |
| 2,68,792 | Dividend (subject to deduction of tax) ... | 3,49,713—81 | |
| 42,575 | | 42,894—99 | |
| 6,00,034 | *Add:* Profit for the year brought from the Profit and Loss account | 8,24,334—81 | |
| 6,42,609 | | 8,67,229—80 | |
| | *Less:* Transferred to: | | |
| 2,00,000 | Reserve Fund — Rs. 4,40,000—00 | | |
| 40,000 | Industrial Development Fund — Rs. 40,000—00 | | |
| 10,000 | Staff Benefit Fund — Rs. 10,000—00 | 4,90,000—00 | 3,77,229—80 |
| 3,92,609 | | | |
| | Carried over ... | | 23,58,72,369—04 |

# MAHARASHTRA ( Limited ) POONA.

**31st DECEMBER, 1961.**

| 31-12-1960 Rs. | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Cash:** | | |
| 1,69,75,744 | In hand, and with Reserve Bank and State Bank of India ( Including Foreign Currency Notes ) ... | | 2,11,87,261—16 |
| | **2. Balances with Other Banks:** ( In current account ) | | |
| 12,61,936 | ( i ) In India ... | 16,55 510—87 | |
| 1,77,792 | ( ii ) Outside India ... | 4,05,595—92 | 20,61,106—79 |
| 51,00,000 | **3. Money at Call and Short Notice** ... | | 70,00,000—00 |
| | **4. Investments:** | | |
| | Securities—At or below redemption value : | | |
| | ( i ) Securities of the Central and State Governments and other Trustee securities, including Treasury Bills of the Central and State Governments. ( Out of these, securities of the face value of Rs. 2,83,54,700/- are with Banks for over-draft arrangements ). .. | | |
| | ( Market Value Rs. 6,88,34,139-75 ) ... | | |
| 6,07,81,241 | ( Face value Rs. 7,06,41,200-00 ) ... | 6,83,14,114—69 | |
| | ( ii ) Shares : At or below cost : | | |
| | Ordinary shares (fully paid-up) (Market value Rs. 19,26,276-00) Rs. 12,45,896-92 | | |
| | Preference shares (fully paid-up) (Market value Rs. 20,16,006-50) Rs. 19,65,614-15 | | |
| | Ordinary shares (partly paid-up) (Market value Rs. 4,95,403-00) Rs. 4,31,203-75 | | |
| 23,36,547 | Preference shares (partly paid-up) ( Market Value Rs. 76,990-00) Rs. 73,735-00 | 37,16,449—82 | |
| | (iii) Debentures or Bonds : At cost | | |
| 31,31,945 | ( Market Value ) Rs. 27,04,073-00 ... | 26,82,032—50 | |
| Nil | ( iv) Gold ... | Nil | 7,47,12,597—01 |
| 6,62,49,733 | | | |
| | **5. Advances:** ( Other than bad and doubtful debts for which provision has been made to the satisfaction of the auditors | | |
| | ( 1 ) Loans, Cash-Credits, Over-drafts etc. | | |
| 6,65,23,123 | ( i ) In India Rs. 9,43,40,908-68 | | |
| Nil | ( ii) Outside India Rs. Nil | 9,43,40,908—68 | |
| | ( 2 ) Bills discounted and purchased ( Excluding Treasury Bills of the Central and State Governments.) : | | |
| 17,86,470 | ( i ) Payable in India Rs. 32,99,167 56 | | |
| 612 | ( ii ) Payable outside India Rs. Nil | 32,99,167—56 | 9,76,40,076—24 |
| | **Particulars of Advances : —** | | |
| 5,76,82,059 | ( i ) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured ... | 8,24,15,587—11 | |
| 42,98,100 | ( ii ) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 67,15,060—55 | |
| 63,30,046 | (iii) Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | 85,09,428—58 | |
| Nil | (iv) Debts considered doubtful or bad, not provided for. | Nil | |
| 6,83,10,205 | | 9,76,40,076—24 | |
| 4,26,147 | ( v ) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 7,12,998—89 | |
| 58,39,755 | (vi) Debts due by Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies as Members ... | 81,85,858—14 | |
| 5,46,706 | (vii) Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 8,80,505—93 | |
| | Carried Over ... | | 20,26,01,041—20 |

# THE BANK OF

## BALANCE SHEET AS

| 31-12-1960 Rs. | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | Brought forward ... | | 23,58,72,369-04 |
| | **10. Contingent Liabilities** | | |
| 2,59,750 | ( i ) On partly paid shares in joint stock companies held by the Bank as investments including shares of the subsidiary company ... | 6,34,825—00 | |
| 2,70,373 | (ii) Guarantees given on behalf of customers ... | 27,34,718—00 | |
| 10,07,154 | (iii) Liability on account of outstanding Foreign Exchange Contracts ... | 7,00,348—00 | |
| | *Notes*—(1) Provision to the full extent in respect of future gratuity to the staff has not been made, the liability for which has not been ascertained. | | |
| | (2) Figures for the previous year have been re-classified or re-arranged where necessary to comform to the lay-out of the accounts for the current year. | | |
| 17,99,07,789 | Total ... | | 23,58,72,369—04 |

Note:-The Balance Sheet has been prepared in conformity with form 'A' of the third schedule to the Banking Companies Act, 1949

## *PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ended 31st December, 1961*

| 31-12-1960 Rs. | EXPENDITURE | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 33,99,211 | 1 Interest paid on Deposits, Borrowings etc. ... | | 41,85,749—57 |
| | 2 Salaries and Allowances and Provident Fund and Gratuity Fund | | |
| 30,400 | General Manager ... | 31,500—00 | |
| 21,42,478 | Others ... | 26,74,205—21 | 27,05,705—21 |
| 23,925 | 3 Directors and Local Committee Members' Fees and Allowances. ... | | 23,208—40 |
| 2,08,502 | 4 Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | | 2,67,822—87 |
| 13,534 | 5 Law Charges ... | | 22,845—21 |
| 1,33,926 | 6 Postage, Telegrams, Stamps and Telephone ... | | 1,75,856—63 |
| 4,000 | 7 Auditors' fees including travelling Expenses. ... | | 4,000—00 |
| 1,06,038 | 8 Depreciation and development rebate on and repairs to the Banking Company's Property ... | | 1,25,010—48 |
| 1,82,441 | 9 Stationery, Printing, Advertisements, etc. ... | | 3,25,933—57 |
| Nil | 10 Loss from sale of or dealing with non-banking assets ... | | Nil |
| | 11 Other Expenditure : | | |
| 1,56,217 | Sundry Charges ... | 2,36,124—18 | |
| 47,931 | Travelling and Conveyance ... | 68,775—61 | 3,04,899—79 |
| 6,00,034 | 12 Balance of Profit carried to Balance Sheet ... | | 8,24,334—81 |
| 70,48,637 | Total Rs. ... | | 89,65,366—54 |

| 31-12-1960 Rs. | INCOME ( Less provisions made during the year for Bad and Doubtful debts and other usual or necessary provisions). | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 61,26,307 | 1. Interest and Discount. ... | | 76,57,444—83 |
| 8,43,603 | 2. Commission, Exchange, Brokerage. ... | | 12,08,229—61 |
| 12,715 | 3. Rent. (Less taxes and other charges) ... | | 18,483—67 |
| Nil | 4. Net Profit on sale of Investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserve or any particular Fund or Account). ... | | Nil |
| Nil | 5. Net profit on revaluation of Investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserve or any particular Fund or Account. ) ... | | Nil |
| Nil | 6. Income from Non-banking assets and profit from sale of or dealing with such assets. ... | | Nil |
| | 7. Other Receipts. | | |
| 598 | Transfer fees ... | 413—85 | |
| 65,414 | Lockers rental ... | 80,794—58 | 81,208—43 |
| 70,48,637 | Total Rs. ... | | 89,65,366—54 |

Note:-The profit and loss account has been prepared in conformity with form 'B' of the third schedule to the Banking Companies Act, 1949.

# MAHARASHTRA ( Limited ) POONA.

**AT 31st DECEMBER, 1959.**

| 31-12-1960 Rs. | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | Brought Forward... | | 20,26,01,041—20 |
| 61,73,796 | (viii) Maximum total amount of advances including temporary advances granted during the year to the Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents, or in the case of private Companies, as Members. ... | 1,08,66,342—47 | |
| 2,81,749 | ( ix ) Due from Banking Companies ... | 69,027—78 | |
| | **6. Bills Receivable. Being Bills for Collection as per contra** | | |
| 1,25,72,731 | ( i ) Payable in India ... | 1,62,45,156—20 | |
| 54,914 | ( ii ) Payable outside India ... | 1,82,813—77 | 1,64,27,969—97 |
| 58,74,556 | **7. Constituents' Liabilities for Acceptances. Endorsements and Other Obligations per contra** ... | | 1,22,39,900—49 |
| | **8. Bank's Premises ( Less Depreciation )** | | |
| | Cost as at 31st December, 1960 ... | 10,60,026—75 | |
| | Additions during the year ... | 4,91,821—45 | |
| | | 15,51,848—20 | |
| 9,13,502 | Less total deperciation to-date ... | 1,78,408—25 | 13,73,439—95 |
| | **9. Furniture, Fixtures, Safe Deposit Vault etc.** | | |
| | Less Depreciation : | | |
| | Cost as at 31st December, 1960 ... | 12,10,870—61 | |
| | Additions during the year ... | 3,43,428—21 | |
| | | 15,54,298—82 | |
| 7,98,205 | Less : Total depreciation to-date ... | 4,97,335—16 | 10,56,963—66 |
| | **10. Other Assets Including Silver :** | | |
| 6,812 | Stamps on hand ... | 9,338—90 | |
| 7,87,037 | Tax paid in advance ... | 11,99,900—95 | |
| 5,43,121 | Interest accrued on Investments (less tax) ... | 6,08,493—54 | |
| 1,21,001 | Sundry advances ... | 1,59,820—38 | |
| 1,21,500 | Shares of the Maharashtra Executor and Trustee Co. Limited (Partly paid) ... | 1,21,500—00 | 20,99,053—77 |
| 15,79,471 | | | |
| | **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** ... | | |
| 39,000 | (Estimated Realisable value Rs. 74,000/-) ... | | 74,000—00 |
| 17,99,07,789 | Total Rs. ... | | 23,58,72,369—04 |

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHAREHOLDERS

We have audited the above Balance Sheet of the Bank of Maharashtra, Limited, as at 31st December, 1961 and also the above Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date, in which are incorporated the returns of 17 Branches audited by other Auditors and the unaudited returns from 62 other Branches not visited by us in respect of which the Central Government has made an order granting exemption from Audit pursuant to Section 228 of the Companies Act, 1956.

We report that—(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory. (b) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank. (c) (1) In our opinion, proper books of accounts as required by law have been kept by Bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the Branches of the Bank. (2) The Reports on the accounts of 17 Branches audited by other Auditors have been considered in preparing our Report. (d) The Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns. (e) In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts together with notes thereon give the information required by the Companies Act, 1956, in the manner so required for Banking Companies and on such basis Balance Sheet gives a true and fair view of the state of the affairs of the Bank as at 31st December, 1961 and the Profit and Loss Account gives a true and fair view of the profit for the year ended upon that date.

13th February, 1962.

**G. D. APTE & CO.**
*Chartered Accountants.*

**KULKARNI & KHANOLKAR**
*Chartered Accountants.*

**Statement pursuant to Section 212 of the Companies Act, 1956:**

(a) The Bank's interest in its Subsidiary, the Maharashtra Executor and Trustee Company Ltd., as at 31st December, 1961 comprised 2,430 shares of the nominal value of Rs. 100/- each of which Rs. 50/- has been paid up.

(b) The Profits of the Subsidiary Company for the year ended 31st December, 1960, have been included in the item 'Interest and Discount' in Bank's Profit and Loss account as at 31st December, 1961, to the extent of dividends amounting to Rs. 2,551-50 (after deduction of tax) declared and paid by the Subsidiary for the year ended 31st December 1960 in respect of the Bank's share-holdings. The undistributed balance of Profit of the Subsidiary amounting to Rs. 674-92 nP., has been carried forward in the accounts of the Subsidiary.

(c) The net aggregate amount of Rs. 27,603-31 nP. received as dividends from the Subsidiary Company for its previous financial years, since its inception as a Subsidiary Company has been dealt with in the Profit and Loss Account of the Bank in the relevant years.

V. P. Varde
*Chairman*

| | | | |
|---|---|---|---|
| **G. L. Halbe** *Chief Accountant* | **C. V. Joag** *General Manager* | **B. M. Gupte** | **D. K. Sathe** |
| | | **M. V. Shah** | **M. B. Jambhekar** |
| | | **M. S. Parkhe** | **J. K. Rege** |
| Poona, | | **V. S. Shirgaonkar** | **R. B. Banthia** |
| 13th February, 1962. | | **S. L. Kirloskar** | **V. R. Dafle** *Directors* |

## 26th REPORT OF THE DIRECTORS — The Bank of Maharashtra Ltd., Poona

*[ 26th Report of the Directors to be submitted to the share-holders at the Annual General Meeting to be held at the registered office of the Bank, Maharashtra Bank Building, 1177 Budhwar Peth, Poona City on Tuesday, the 27th March, 1962 at 2-30 P. M. ( I. S. T. ) ]*

Your Directors beg to submit the Balance Sheet and Profit and Loss Account for the year ended 31st December, 1961, duly certified by the Auditors.

| | | |
|---|---|---|
| It will be seen that the transactions of the Bank during the year under report, after meeting all expenses and after providing Rs. 2,25,000, for Bonus to Staff for the year 1961, transferring Rs. 1,00,000/- to Trustees, Staff Gratuity Fund, providing for taxation and after making usual and necessary provisions, resulted in a net profit of | | Rs. 8,24,334-81 |
| as against Rs. 9,50,033-69 of the last year, before providing for taxation. | | |
| After transferring out of the current year's profit :— | | |
| To Reserve Fund ... | Rs. 4,40,000-00 | |
| To Industrial Development Fund... | Rs. 40,000-00 | |
| To Staff Benefit Fund ... | Rs. 10,000-00 | Rs. 4,90,000-00 |
| there remains a balance of ... | | Rs. 3,34,334-81 |
| Adding thereto ... | | Rs. 42,894-99 |
| the balance brought forward from the previous year, the amount available for distribution is ... | | Rs. 3,77,229-80 |
| which your Directors recommend be appropriated as under : | | |
| To pay dividend on 80,000 shares for the year ended 31st December, 1961 at 9% P. A., on the paid up amount of the shares, pro-rata, subject to deduction of tax. ... | | Rs. 3,34,880-00 |
| To carry forward to next year's account ... | | Rs. 42,349-80 |
| ... | | Rs. 3,77,229-80 |

The year under report was an eventful year for the Bank.

The Silver Jubilee celebrations continued in the early months of the year as stated in the last report.

During the year under report three Banks viz. The Bank of Nagpur Ltd., The Bank of Konkan Ltd., and the Bharat Industrial Bank Ltd., merged with our Bank in accordance with the schemes of amalgamation sanctioned by the Reserve Bank of India. These mergers have opened new areas like the Vidarbha and the Konkan regions for our activities. Twenty-four Branches of these Banks were added to our list of Branches. We opened three new Branches, two in Bombay and one at Chinchwad (Bombay-Poona Road) during the year under repport. We have now 79 Branches in all the parts of the new Maharashtra State.

The Panshet tragedy that occurred in Poona on 12th July, 1961 paralysed Trade, Commerce and Industry in Poona to a very great extent.Our Deccan Gymkhana Branch was completely under water and thanks to the heroic efforts by the staff, the cash and valuables were saved and the record, though damaged, was traced and reconstructed. Within a period of 18 days after the tragedy the Branch started normal working. Our Bank played a very prominent role in the rehabilitation of Trade, Commerce and Industry in Poona and our efforts in this direction were very much appreciated both in Government and private quarters.

It is now proposed to make a further issue of capital of 10,00,000/-. The sanction of the Controller of Capital Issues is awaited. This will mean that our paid-up capital will be equal to the authorised capital. In accordance with the advice of Reserve Bank of India given to Banks in India our Bank will have to substantially raise the Paid-up Capital as also the Reserve so as to reach a

target of 6% of the deposits. A proposal is, therefore, placed before the meeting for raising the Authorised Capital to Rs. 2,00,00,000/- and authorising the Directors to issue fresh capital from time to time as may be necessary. We trust the shareholders will fully support the Board of Directors in this policy by subscribing liberally to the capital of the Bank. You will have noticed that the Board of Directors have taken a substantially larger amount to Reserves this year, so that the above goal may be reached early. Our Reserve now stand at Rs. 22,00,000/-.

During the year under report Shri F. D. Fudumjee who was a Director since the beginning resigned on grounds of health. During all these years Shri Pudumjee took keen interest in the affairs of the Bank and helped in many ways in the all round progress of the Bank even at personal sacrifice to himself. The Board has placed on record its deep sense of appreciation of the very valuable advice and help given by Shri Pudumjee from time to time.

Shri S. L. Kirloskar, who was formerly a Director of the Bank but who had resigned on his appointment as a Director of the State Bank of India was co-opted as a Director on his retirement from the said Bank.

Shri V. R. Dafle ( Raja of Jath ) was also co-opted as a Director soon after the close of the year under report.

Shri Kirloskar and Shri Dafle retire on the date of the meeting and are eligible and offer themselves for election.

Under Article 99 of the Article of Association Shri D. K. Sathe, Shri M. V. Shah, and Shri R. B. Banthia retire by rotation. They offer themselves for re-election.

Shri D. K. Sathe has attained the age of 70 years and therefore a resolution as per Section 281 is required to be passed by the share holders. A special notice under Section 281 has been received from a shareholder.

Shri M. V. Shah has attained the age of 65 years and therefore a resolution as per Section 281 is required to be passed by the share holders A special notice under Section 281 has been received from a shareholder.

The Directors thank the members of Local Advisory Committees for their co-operation.

The Balance Sheet, Profit and Loss Account and Report of Directors of the Subsidiary, the Maharashtra Executor and Trustee Company Ltd., are attached.

You are requested to appoint Auditors and fix their remuneration.

According to recent amendments to the Companies Act, 1956, the Branch accounts will have to be audited by Auditors appointed by you unless exmption is granted by the Central Government. Resolution authorising the Directors to apply for necessary exemption for 1962 and, on failing to secure that, to make arrangements for audit of Branches for 1962 by qualified persons and to fix their remuneration is required to be passed by you. The necessary resolution is being proposed.

We regret to report the sad death of Shri D. R. Khanolkar of M/s. Kulkarni and Khanolkar, our Auditors, in the month of January, 1961.

For and on behalf of the Board of Directors

POONA
13th February, 1962.

C. V. Joag
*General Manager.*

V. P. Varde
*Chairman.*

# पुणें सहकारी विद्यालय

**१० बी. जे. रोड, टाटा लॉज, सेंट्रल बिल्डिंग शेजारी, पुणें १.**

विद्यालयाचा पुढील शिक्षणक्रम दिनांक २ जुलै १९६२ रोजीं सुरू होईल. सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांतील आणि मार्केट कमिट्यांतील नोकरवर्गासाठीं हा शिक्षणक्रम उपयुक्त असून तो ६ महिने मुदतीचा आहे. विद्यालयांत एकूण १०० जागापैकीं ८० जागा सहकारी सोसायट्यांचे नोकरवर्गासाठीं असून २० जागा खाजगी उमेद्वारासाठीं असतात. सोसायट्यांतील उमेद्वारांना दरमहा रु. ४०–०० विद्यावेतन व प्रवासभत्ता ( खर्च ) दिला जातो. खाजगी विद्यार्थ्यांना शिक्षणक्रमाची फी म्हणून रु. ४०–०० भरावे लागतात.

**शैक्षणिक पात्रता :** सोसायट्यांतील नोकर एस. एस. सी. पास असले पाहिजेत. एस. एस. सी. पास नसल्यास त्यांचें किमान शिक्षण इंग्रजी १०, प्राथमिक शालान्त परीक्षा किंवा सेक्रेटरी शिक्षण वर्ग परीक्षा पास इतकें तरी असलें पाहिजे व शिवाय संस्थेंतील पगारी नोकरीचा अनुभव किमान तीन वर्षांचा पाहिजे. संस्थेमार्फत अगर खात्यामार्फत आलेल्या उमेद्वारांना विद्यालयांत वसतिगृहांत राहणें आवश्यक असतें. खाजगी विद्यार्थ्यांस जागा असल्यास वसतिगृहांत प्रवेश मिळेल.

खाजगी उमेद्वार किमान एस. एस. सी. उत्तीर्ण असले पाहिजेत.

विद्यालयाचे प्रवेश अर्ज व माहिती–पत्रक याची किंमत ५० न. पै. असून ते विद्यालयाचे कचेरींत अगर पुढील सहकारी बोर्डांचे कचेऱ्यांत मिळूं शकतील.

( १ ) पुणें जिल्हा सहकारी बोर्ड लि., १४८७, शुक्रवार पेठ, पुणें २.

( २ ) ठाणें जिल्हा सहकारी बोर्ड लि., शिवाजी चौक, कल्याण.

( ३ ) कुलाबा जिल्हा सहकारी बोर्ड लि., बाजार पेठ, पेण.

( ४ ) सोलापूर जिल्हा सहकारी बोर्ड लि., १२२, दक्षिण कसबा, दुसरा माळा, सोलापूर.

अर्जांच्या फार्मची मागणी करते वेळीं ५० न. पैसे रोख भरावेत किंवा पोस्टाच्यीं तिकीटें पाठवावींत. मनिऑर्डर करूं नये.

अर्ज पूर्ण भरून आपापल्या जिल्ह्याच्या सहकारी बोर्डांकडे पाठवावेत. सोसायट्याच्या नोकरांनीं अर्जासोबत संस्थेचे ठराव पाठविणें अवश्य आहे. विद्यालयाकडे परस्पर अर्ज कोणीहि पाठवूं नयेत. सर्व अर्ज ज्या त्या जिल्हा सहकारी बोर्डामार्फत येणें आवश्यक आहे.

प्राचार्य,
पुणें सहकारी विद्यालय, पुणें.

## वेंगुर्ला को. अर्बन बँकेचा रौप्यमहोत्सव

### व्यवहार बंद करावे लागणाऱ्या संस्थेची पुन्हा यशस्वी वाटचाल

११ मे, १९६२ रोजीं प्रा. ध. रा. गाडगीळ ह्यांच्या अध्यक्षतेखाली बँकेचा रौप्यमहोत्सव साजरा झाला.

वेंगुर्ला को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. या संस्थेची प्रतिष्ठापना सन १९३६ सालीं होऊन चालू वर्षी ह्या संस्थेस २५ वर्षे पूर्ण झालीं. पहिलीं ६ वर्षे संस्थेचें सर्वसाधारण स्वरूप अगदीं बाल्यावस्थेंतील होतें. हळूहळू स्थानिक, उत्साही आणि कर्तबगार सभासदांच्या सक्रिय सहकार्याच्या जोरावर संस्थेच्या भरीव कार्याची सुरुवात १९४२ पासून झाली व तेथपासून ते सन १९५२ पर्यंत बँकेचे सभासद, ठेवीदार आणि हितचिंतक यांच्या भरघोस पाठिंब्यानें संस्थेच्या ठेवी, शेअर भांडवल आणि फंडस् यांमध्यें स्पृहणीय अशी प्रगति होत गेली आणि वेंगुर्ल्याच्या नागरी जीवनांत बँकेस महत्त्वपूर्ण व मानाचें स्थान प्राप्त झालें; परंतु पुढें वेंगुर्ल्याच्या व्यापारास मंदीची झळ लागली. तिचा परिणाम त्या त्या उद्योगधंद्यावर स्वाभाविकच होऊन आर्थिक जीवन विस्कळित झालें. कर्जदारांकडील कर्जें स्थगित होत गेलीं. कूळकायद्यासारख्या कायद्यांच्या अडचणी. जमिनी आणि उत्पन्नाच्या इतर बाबींमधून येणारें उत्पन्न घटत चाललेलें. लहान लहान व मध्यमवर्गीय ठेवीदारांना (ज्यांचा भरणा बँकेमध्यें प्रामुख्यानें आहे.) ठेवी काढून घेण्याची वाढत्या प्रमाणांत गरज भासूं लागली. ठेवींची रक्कम चारसाडेचार लक्ष रुपयांवरून सवादोन लक्ष रुपयांपर्यंत खाली आली. कर्जाची वसुली समाधानकारकपणें न होत गेल्यानें पुढें पुढें ठेवीदारांच्या मागण्या पुरविणें दिवसेंदिवस कठीण होत गेलें. आणि या सर्वांचा अनिष्ट असा परिणाम बँकेच्या व्यवहारावर होऊन नाइलाजानें ठेवींच्या देवीघेवीचे व्यवहार मार्च १९५६ मध्यें स्थगित करणें भाग पडलें. अशा परिस्थितींत सभासदांच्या आणि विशेषत: ठेवीदारांच्या हितसंबंधाचें रक्षण करण्याच्या दृष्टीनें डायरेक्टर बोर्डामधील मंडळी व स्थानिक हितचिंतक यांनीं महाराष्ट्र स्टेट को-ऑ. बँकेच्या सल्ल्यानें बँकेचे व्यवहार चालू करण्याचे दृष्टीनें प्रयत्न केले; आणि संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेऊन महाराष्ट्र स्टेट को-ऑ. बँकेचे त्यावेळचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वामनराव वर्दे यांच्या अचूक मार्गदर्शनाखाली आणि वेंगुर्ल्याचे अभिमानी श्री. बाळासाहेब गाडेकर यांच्या सक्रिय सहकार्याच्या जोरावर बँकेच्या पुनर्रचनेची योजना डायरेक्टरबोर्डास मूर्तस्वरूपांत मांडतां आली.

बिकट परिस्थितींतहि ठेवीदारांनीं अत्यंत समजूतदारपणाचें धोरण ठेवून अडचणींतून मार्ग काढणेस आणि पुनर्रचनेच्या योजनेप्रमाणें बँकेचें कामकाज पुन्हा सुरू करणेच्या प्रयत्नाला सहकार्य दिलें. योजना अमलांत आणणेपूर्वीं नवीन वातावरण निर्माण करण्याच्या उद्दिष्टानें व संस्था पुढें चालू करणेकरितां जरूर ती आस्था आहे हें सिद्ध करण्याच्या दृष्टीनें बँक बंद असलेल्या मुदतींत पुनर्रचनेसाठी नवीन ठेवी जमविण्याचे कामीं अनेक व्यक्तींनीं पुढें येऊन आपलें सक्रिय सहकार्य देऊन हातभार लावला व चालक वर्गावर विश्वास दाखविला. वेंगुर्ल्याचे अभिमानी बेळगांवचे सुप्रसिद्ध व्यापारी श्री. आ. रा. प्रभु आजगांवकर; मुंबई येथील इंडस्ट्रिअल अँड सप्लाय कंपनीचे श्री. एम्. व्ही. शेटये, श्री. बाबासाहेब गाडेकर यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केल्याशिवाय राहवत नाहीं. या सर्वांच्या सहकार्यानें पुनर्रचनेचें कार्य सुकर झालें व श्री. वामनराव वर्दे यांच्या शुभहस्तें अक्षय्य तृतीया दि. २ मे १९५७ रोजीं बँकेचें पुनरुद्घाटन होऊन बँकेच्या कामकाजास सुरुवात झाली; आणि ही जुनी नागरी सहकारी बँक टिकवून धरण्याच्या प्रयत्नास पूर्णतया यश आलें. ठेवीदार, सभासद आणि हितचिंतक यांनीं भरीव सहकार्य दिल्यामुळें व कर्जदारांनींहि आपली जबाबदारी ओळखून चालकवर्गावर शक्यतों कायदेशीर अवलंब करूं देण्याची पाळी न आणूं देतां थकबाकीची फेड केली व करीत आहेत यामुळें पुनर्रचनेची योजना यशस्वीपणें राबविणें शक्य होत गेलें.

बँकेनें ठेवीदारांमध्यें विश्वास उत्पन्न केला, त्याचें प्रतीक म्हणजे बँकेकडील ठेवी ५ वर्षांपूर्वी २,२६,००० रु. च्या होत्या, त्या आतां ३,७९,६४४ रु. च्या झाल्या आहेत. पुनर्रचनेपासून एकूण ठेवखात्यांत ७९८ नें वाढ झाली आहे. सभासदसंख्या ६६० नें वाढून भागभांडवलांत १५,६२० रु. ची भर पडली आहे. कर्जवसुलीहि समाधानकारक होऊन बँकेचा क वर्ग होता, तो आतां ब वर्ग झाला आहे. परस्पर-विश्वास आणि सहकार्य ह्यानें घडून येणारे सुपरिणाम वेंगुर्ला बँकेनें सिद्ध करून दाखविले आहेत; तिच्या रौप्यमहोत्सवास त्यामुळें विशेष महत्त्व आहे.

---

## दिल्ली ते लंडन मोटार सर्व्हिस

### सरकारकडे चार अर्ज

भारत आणि लंडन या दरम्यान मोटारवाहतूक सुरू करण्यासाठी भारत सरकारची मान्यता मिळविण्यासाठी भारत सरकारकडे एकूण चार जणांनीं अर्ज केले आहेत. यांपैकी दोघांनीं मुंबई ते लंडन, तिसऱ्यानें दिल्ली ते लंडन आणि चौथ्यानें भारत ते ब्रिटन या दरम्यान मोटारवाहतूक करण्यासाठी हे अर्ज केले आहेत. परंतु ज्या मार्गावरून ही वाहतूक होणार आहे त्या मार्गावरील संबंधित सरकारांशीं याबाबतची व्यवस्था करण्यापूर्वीं भारत सरकारला याबाबत कोणताहि निर्णय घेतां येत नाहीं. याबाबतच्या कराराचे नियम व अटी नक्की करण्यांत येत आहेत. भारत-लंडन मोटार वाहतुकीचा कोणताहि थेट मार्ग पाकिस्तानांतूनच जाईल आणि अमृतसर ते लाहोर या दरम्यान मोटारवाहतूक चालू करण्याबाबत पाकिस्तानशीं करार करण्यांत आतांपर्यंत तरी यश मिळालेलें नाहीं.

---

### गोवें, दमण व दीवमधील एस्क्युडो चलन

गोवें, दमण व दीव येथें सध्यां कायदेशीर चलन म्हणून चालत असलेलें एस्क्युडो चलन १५ मे १९६२ पासून रद्द झालें आहे. या तारखेपासून व त्यापुढें सर्व चलनविषयक व्यवहार फक्त भारतीय चलनांतूनच होतील.

बरेचसें एस्क्युडो चलन यापूर्वींच वापरांतून काढून घेण्यांत आलें असून त्याऐवजीं सर्वसाधारण व्यवहारांत भारतीय चलन चालू झालें आहे. तथापि, अजूनहि ज्यांच्याकडे हें चलन असेल त्यांस तें भारतीय चलनांत बदलून घेतां यावें म्हणून स्टेट बँक ऑफ इंडियाच्या पणजी, वास्कोडिगामा, मार्मागोवा, म्हापसें, मापुका व दमण येथील शाखाकचेऱ्यांत, स्टेट बँक ऑफ सौराष्ट्राच्या दीव येथील शाखाकचेरींत आणि गोवें, दमण व दीव येथील सर्व ट्रेझरींत तशी सोय करण्यांत आली आहे. ही सोय १५ मे, १९६२ पासून एस्क्युडो नोटांचे बाबतींत एक महिन्यापुरती व एस्क्युडो नाण्यांचे बाबतींत ३ महिने राहील.

---

### नट-नट्यांचा "काळा पैसा" उजेडांत येणार

चित्रपटनिर्मात्यांकडून कित्येक नट-नटी "काळा पैसा" घेतात, त्यामुळें सरकारचा इन्कमटॅक्स बुडतो. अशा नट-नट्यांच्या इन्कमटॅक्सच्या आकारणीसाठी मुंबई आणि कलकत्ता येथें खास इन्कमटॅक्स सर्कल्स निर्माण करण्यांत आलीं आहेत.

## ट्रॅक्टर्सचा वाढता वापर : पंजाब अग्रेसर

गेल्या पांच वर्षांत, भारतांत वापरामध्यें असलेल्या ट्रॅक्टर्सची संख्या ६०% नें वाढली आहे. १९५६ मध्यें त्यांची संख्या २१,००० होती, ती १९६१ मध्यें ३४,००० झाली. सर्वांत जास्त ट्रॅक्टर्स पंजाबमध्यें असून त्याखालोखाल उत्तर प्रदेशाचा अनुक्रम येतो. ट्रॅक्टर्सची राज्यवार संख्या अशी आहे :—

| | |
|---|---|
| पंजाब | ७,८४० |
| उत्तर प्रदेश | ७,११५ |
| राजस्तान | ४,१८३ |
| आंध्रप्रदेश | २,४६० |
| मध्यप्रदेश | २,०४७ |
| गुजरात | १,८६२ |
| बिहार | १,७९३ |
| महाराष्ट्र | १,४१५ |
| मद्रास | १,३९० |
| म्हैसूर | ९३४ |

१९६० सालापूर्वी भारतांत ट्रॅक्टर्स तयार होत नव्हते. त्या वर्षी भारतांत ट्रॅक्टर्सचें उत्पादन सुरू झालें. सध्यां वार्षिक ६,००० नग तयार होऊं शकतील. १९६५-६६ अखेर दरसाल १०,००० ट्रॅक्टर्सचें उत्पादन होईल, अशी अपेक्षा आहे. ट्रॅक्टर्सचे बाबतींत अद्याप आयातीवर आपलें मोठें अवलंबून आहे.

## भारतांतील सिमेंटचें उत्पादन

भारतांत सिमेंटचे ३४ कारखाने असून त्यांपैकी १४ असोसिएटेड सिमेंट कंपनीच्या मालकीचे आहेत आणि त्यांत भारतांतील उत्पादनाच्या ४७% उत्पादन होतें. भारतांतील कारखान्यांची उत्पादनक्षमता आणि उत्पादन ह्यांचे आंकडे खाली दिले आहेत:—

| वर्ष | उत्पादन-क्षमता ( कोटी टन ) | उत्पादन ( कोटी टन ) |
|---|---|---|
| १९५० | ३·१ | २·६ |
| १९५१ | ३·६ | ३·२ |
| १९५२ | ३·८ | ३·५ |
| १९५३ | ४·२ | ३·८ |
| १९५४ | ४·४ | ४·४ |
| १९५५ | ४·७ | ४·५ |
| १९५६ | ५·७ | ४·९ |
| १९५७ | ६·६ | ५·६ |
| १९५८ | ७·२ | ६·२ |
| १९५९ | ८·६ | ७·० |
| १९६० | ९·० | ८·१ |
| १९६१ | ९·४ | ८·७ |

## नवीं पोस्ट ऑफिसें

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत आणखी २० हजार कचेऱ्या उघडण्याचा संकल्प होता. पण प्रत्यक्षांत त्याहून अधिक म्हणजे २२,२३१ कचेऱ्या चालू करण्यांत आल्या. ३१ मार्च १९६१ रोजीं देशांत एकूण अंदाजें ७७,००० कचेऱ्या होत्या. १९६१-६२ मध्यें २,५३० कचेऱ्या उघडण्यांत आल्या, तर ३१ मार्च १९६३ पर्यंत आणखी ३,७०० कचेऱ्या सुरू होतील असा अंदाज आहे. याचबरोबर खेडेगांवांत टपाल पोंचविण्याचें प्रमाण वाढविण्यांत येत आहे.

## महारोग्यांसाठी उपचार केंद्र

महारोग झालेल्या रोग्यांना उपचार करण्यासाठी भारत व स्वीडन मिळून एक उपचारकेंद्र मद्रास राज्यांत स्थापन करणार आहेत. उपचारांत शस्त्रक्रिया व महारोग्यांना द्यावयाचें शिक्षण ह्यांचा अंतर्भाव आहे. हे केंद्र स्वीडनची व भारताची रेड क्रॉस संघटना चालविणार असून त्याला इंडिया लेप्रसी असोसिएशनचें सहकार्य लाभणार आहे. स्वीडनची रेड क्रॉस संघटना ह्या उपक्रमासाठी ५ वर्षांत ५ लाख रुपये देणार आहे. भारतांतहि कांहीं निधि जमविण्यांत आला आहे. महारोग्यांचे निकामी झालेले अवयव पूर्व स्थितीला आणण्यासाठी कराव्या लागणाऱ्या शस्त्रक्रिया स्वीडनचे डॉक्टर्स भारतामधील कार्यकर्त्यांना शिकवतील. ह्या शस्त्रक्रिया महारोगानें ग्रस्त झालेले अवयव बरे झाल्यावर करावयाच्या असतात. शिवाय रोग्यांना आपले बरे झालेले अवयव कसे वापरावे हेंहि शिकविण्यांत येईल.

## ट्रॅन्झिस्टर रेडिओसाठी पणजींत रांगा

पणजी येथील अनेक व्यापाऱ्यांनीं परदेशांहून आयात झालेला अनेक प्रकारचा माल दडवून त्याचा काळाबाजार चालविल्याच्या तक्रारी करण्यांत येत होत्या. अखेर पोलिसांनीं अनेक व्यापाऱ्यांच्या गुदामावर झडत्या नेल्या. झडत्यांत अनेक प्रकारचा रोजखपाचा माल मिळाला असून तो घेण्यासाठी गिऱ्हाइकांच्या रांगा लागल्या आहेत. एका व्यापारी कंपनीच्या वखारीची झडती घेतां पोलिसांना घट्ट दुधाचे २६,००० डबे, चांगल्या प्रतीच्या कॉफीच्या १०० पेट्या व इतर बराच माल सांपडला. सर्वांत अधिक मागणी ट्रॅन्झिस्टर रेडिओ सेटस्‌ना आहे. गेल्या कांहीं दिवसांत अशा प्रकारचे ३०० पेक्षा अधिक सेटस् विकण्यांत आले. ट्रॅन्झिस्टर सेटस् व इतर माल घेण्यासाठी रांगेनें उभे राहणाऱ्या लोकांत लहान मुलेंहि आहेत.

## आसाममधील उद्योगधंदे

आसाम राज्याने अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण होण्याची अवस्था जवळ जवळ गांठली असल्यानें राज्य सरकार आतां कृषि औद्योगिक संस्था स्थापन करण्यावर अधिक भर देऊं लागलें आहे. त्यासाठी व्यापारी पिकांच्या उत्पादनास उत्तेजन देण्यांत येत आहे. काचार जिल्ह्यांत फळें डबाबंद करण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. आसाम राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत व्यापारी पिकांच्या वाढीसाठी १ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

## स्त्रियांच्या सहवासाला कंटाळला

ऑस्ट्रेलियाचें सरकार अविवाहित तरुणींना वसाहतींत येऊन स्थायिक होण्यास उत्तेजन देत असतें. ऑस्ट्रेलिअन सरकारच्या ह्या धोरणास अनुसरून ८५ ग्रीक तरुणी व एक ग्रीक ब्रह्मचारी एका विमानानें सिडने येथें आले. विमानांतील प्रवाशांत तो एकटाच पुरुष होता. त्याला कांहीं खाणेंपिणें लागलें कीं एकदम पांच सहा तरुणी त्याची विचारपूस करीत. सिडने येथील विमानतळावर उतरल्यावर तो तरुण म्हणाला, "ब्रह्मचारी तरुण म्हणून मला स्त्रियांच्या सहवासाची आवड आहे. परंतु ८५ तरुणींच्या तांड्यांत सांपडल्यावर मला त्यांचा कंटाळा आला. आतां निदान एक महिनाभर तरी मला स्त्रीदर्शन नको आहे. त्यांतहि ग्रीक स्त्रीचें दर्शन मुळींच नको आहे."

### रशियाच्या साह्यानें लष्करी विमानांचें उत्पादन

भारताच्या उत्तर सरहद्दीवर चीनच्या आक्रमणाचें भय उत्पन्न झालें आहे. त्याचप्रमाणें, काश्मीरच्या प्रश्नावर पाकिस्तानशीं नित्य कटकटी चालू आहेत. त्यांतच पाकिस्तानला अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर लष्करी मदत देण्यांत आली आहे. ह्या सर्व परिस्थितीचा विचार करून आपली संरक्षक ताकद वाढविण्यासाठी भारत रशियाकडून लढाऊ विमानें विकत घेण्याचा विचार करीत आहे. परंतु त्यामुळें ब्रिटन व अमेरिका ह्या देशांच्या सरकारांत कांहींशी अस्वस्थता उत्पन्न झाली आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणांत कोणत्याहि गटाच्या आहारीं जाण्याच्या भारताच्या धोरणाशीं रशियाकडून होणारी विमानांची संभाव्य खरेदी विसंगत असल्याचा सूर प्रगट करण्यांत येत आहे. उलटपक्षीं, भारतहि आपली बाजू मांडीत आहे. रशियाकडून विमानें खरेदी करण्याचा विचार करण्यापूर्वी ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका, इत्यादि देशांकडून विमानें देण्याची तयारी दाखविण्यांत आलेली होती व भारत सरकारनें त्यासंबंधीं विचारहि केलेला होता. परंतु सोव्हिएट रशियाकडून ज्या अटीवर विमानें पुरविण्याची तयारी दाखविण्यांत आली त्या अटी भारत सरकारला अधिक आकर्षक वाटल्याचें समजतें. परंतु हें प्रकरण एवढ्यावरच थांबणार नाहीं असें दिसतें. कारण, रशियाची तांत्रिक मदत घेऊन ध्वनीपेक्षांहि अधिक वेगानें जाणारीं लढाऊ विमानें भारतांतच तयार करण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. युद्ध टाळण्याचे अटोकाट प्रयत्न भारत सरकार करीत आहेच, परंतु सध्यांच्या अनिश्चित आणि धोक्याच्या परिस्थितींत संरक्षक सामर्थ्याच्या बाबतींत कोणत्याहि देशावर अवलंबून राहणें गाफीलपणाचेंच मानलें जाईल. म्हणून लढाऊ विमानांच्या उत्पादनाबाबत झपाट्यानें पावलें टाकण्यांत आलीं, तर तीं योग्यच ठरतील.

---

### माझगांव येथील बोटी बांधण्याचा कारखाना

मुंबई येथील माझगांव डॉक. लि. हा बोटी बांधण्याचा कारखाना भारत सरकारनें १९६० च्या एप्रिल महिन्यांत आपल्या अखत्याराखालीं आणला. ह्या कंपनीचा १९६०-६१ सालचा अहवाल लोकसभेला सादर करण्यांत आला आहे. त्यावरून कंपनीच्या कामकाजाची माहिती कळूं शकते. अहवालाच्या वर्षी कंपनीला ६·८१ लाख रुपये नफा झाला. घसारा आणि कंपनीच्या नोकरांना द्यावयाचा बोनस ह्यांची तरतूद करून कंपनीला ८७ हजार रु. निवळ नफा झाला आहे. शिवाय परदेशीय चलनाची प्राप्ति करून देणारा एक कारखाना म्हणूनहि कारखान्याकडे बोट दाखविता येईल. १९६०-६१ सालीं कारखान्यांत २४७ लाख रुपयांची उलाढाल झाली त्यांपैकी १००·८१ लाख रुपयांची उलाढाल परदेशीय चलनाच्या रूपानें झाली. माझगांव येथील गोदींत नव्या बोटी बांधण्यांत येतात व जुन्यांची दुरुस्ती करण्यांत येते. त्याशिवाय ६ आश्वशक्तीपासून २० अश्वशक्तीपर्यंतचीं डिझेल इंजिनेंहि कारखान्यांत बनविण्यांत येतात. कंपनीकडे २६० लाख रुपये किंमतीच्या बोटी बांधण्याच्या मागण्या नोंदविण्यांत आल्या आहेत. येत्या अडीच वर्षांच्या कालांत ह्या मागण्या पुऱ्या करावयाच्या आहेत. गेल्या पांच वर्षांत कारखान्यांतील ह्याविषयीं सरासरी वार्षिक उलाढाल अवघी २८ लाख रुपयांची होत असे, परंतु आतां दरसाल सरासरी १ कोटी रुपयांची उलाढाल होईल असा अंदाज आहे. त्यामुळें बोटींच्या खरेदीवर खर्च होणाऱ्या परदेशीय चलनाची बचत होईल. भारतीय नाविक दलासाठी ५ बोटी बांधण्याचें काम माझगांवच्या कारखान्याला मिळालें आहे. अंदमानची फेरी करण्यासाठी २५०० टनांची एक प्रवासी बोट बांधण्याचें कामहि करण्यांत येणार आहे.


टेलिफोन नं. २४८३.

## पुणें सेंट्रल

### को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,

लक्ष्मी पथ, पुणें शहर.

इकडे वेळींच लक्ष द्या..........

आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा सहकारी बँकेंत गुंतवून निश्चिंत राहा.

दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून आमचे बँकेनें कायम व सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचे दरांत वाढ केली आहे.

| कायम ठेव | व्याजाचे नवीन दर |
|---|---|
| १ वर्ष ... ... | ४ टक्के |
| २ वर्षें ... ... | ४। टक्के |
| ३ वर्षें ... ... | ४॥ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव ... ... | २॥ टक्के |

या खेरीज शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिट्सवरील व्याजाचे दराबाबत चौकशी करणेसाठी कार्यकारी संचालक यांना बँकेचे वेळेंत समक्ष भेटा. संबंधी सर्व माहिती ते आनंदानें पुरवतील.

बा. ग. अळतेकर, बी. कॉम., कार्यकारी संचालक.

शि. म. काळे, एम्. एल्. ए. अध्यक्ष.



## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः—युवरबँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :—०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :-२ टक्के

**मुदत ठेवी**

१ वर्ष—४ टक्के, २ वर्षें—४·२५ टक्के, ३ वर्षें—४·५० टक्के, ४ वर्षें—४·७५ टक्के, ५ वर्षें—५ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युमिलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

**शाखा विस्तार**

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर—मार्केट यार्ड, ११. इलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| गंगाजळी | रु. | ५,६६,००० |
| ठेवी | रु. | ३,०१,६९,०३० |
| खेळतें भांडवल | रु. | ३,५१,८७,००० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., *जनरल मॅनेजर.*

शं. ह. साठे, बी. ए., एल्एल्. बी. *चेअरमन.*

## ब्रिटनकडून भारताला आणखी कर्जे

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेला मदत म्हणून ब्रिटनकडून भारताला आणखी दोन मोठीं कर्जें मिळालीं आहेत. दोन्ही कर्जांची मिळून रक्कम ३ कोटी पौंड अथवा सुमारें ४० कोटी रुपये आहे. त्यांपैकीं १ कोटी पौंडांचें कर्ज कोणत्याहि विशिष्ट कामासाठी देण्यांत आलेलें नाहीं. तरी पण त्याचा उपयोग ब्रिटनमध्यें माल खरेदी करण्यासाठीच फक्त करता येईल. २ कोटी पौंडांची रक्कम दुर्गापूर येथील पोलादाच्या कारखान्याचा विस्तार करण्यासाठी वापरण्यांत येणार आहे. भारताची पौंडांतील गंगाजळी फारच खालच्या पातळीवर गेलेली आहे. अशा वेळीं ह्या कर्जांचा भारताला फार चांगला उपयोग होणार आहे. ब्रिटननें भारताला आतांपर्यंत ४·५ कोटी पौंड मदतीदाखल दिलेले आहेत. म्हणजे तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला मदत म्हणून ब्रिटननें १०० कोटी रुपये दिलेले आहेत.

---

## विजेच्या भारी यंत्रसामग्रीचा कारखाना

उत्तर प्रदेशांत राणीपूर ह्या ठिकाणीं रशिआच्या मदतीनें विजेची भारी वजनाची यंत्रसामग्री तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यासंबंधींच्या करारावर उभयता देशांच्या प्रतिनिधींनीं नुकत्याच सह्या केल्या. कारखान्याच्या उभारणीसाठी ४० कोटी रुपये भांडवल लागणार आहे. कारखान्याची सर्व उत्पादनक्षमता कारणीं लागली कीं त्यांत १,८०० एंजिनिअर्स व इतर तंत्रज्ञांना काम मिळेल. त्याशिवाय ६,००० कामगारांना रोजगार मिळेल. हा कारखाना व रांची येथील अवजड यंत्रसामग्रीचा कारखाना ह्यांच्या साह्यानें भारतामधील कोणत्याहि धंद्याला लागणारी यंत्रसामग्री तयार करता येईल.

---

## जगांत वृद्धांची संख्या वाढत चालली

आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेनें वयस्कर कामगारांसंबंधी व त्यांच्या सेवानिवृत्तीविषयीं एक अहवाल तयार केला आहे. त्यांत कांहीं उद्बोधक माहिती ग्रथित करण्यांत आली आहे, ती अशी : जगांतील लोकसंख्या अत्यंत वेगानें वाढत आहे. आज जगांत ६० पेक्षा अधिक वय असलेल्या माणसांची संख्या २० कोटी आहे. १९७५ च्या सुमारास ६० पेक्षा अधिक वय असलेल्यांची संख्या ३० कोटींच्या घरांत जाण्याची शक्यता आहे. १० वर्षांपूर्वीं जगांतील म्हाताऱ्यांची संख्या जितकी होती त्यामानानें आजची वृद्धांची संख्या पुष्कळच जास्त आहे. ती सुमारें ४·५ कोटींनीं अधिक असावी असा अंदाज करण्यांत आला आहे. वृद्धांची संख्या वाढल्यामुळें आर्थिक उत्पादनावर परिणाम होतो. रोगप्रतिकार अधिक कार्यक्षम झाल्याचा हा परिणाम असावा.

---

## झेकोस्लोव्हाकिआकडून तांत्रिक साह्य

झेकोस्लोव्हाकिआंतील चार तंत्रज्ञांचें एक मंडळ भारताच्या दौऱ्यावर आलें आहे. आंध्र प्रदेशांत मध्यम प्रतीचे व छोटे उद्योगधंदे काढण्यास कितपत वाव आहे ह्यासंबंधी त्यांनीं प्रदेशाच्या उद्योगमंत्र्यांशीं चर्चा केली. निरनिराळ्या प्रकारच्या ४० उद्योगधंद्यांची स्थापना करतां येणें शक्य आहे असें मत त्यांनीं व्यक्त केलें. ह्या उद्योगधंद्यांना लागणारी यंत्रसामग्री व तांत्रिक ज्ञान उपलब्ध करून देण्याची तयारीहि त्यांनीं आपल्या देशातर्फे दाखविली. संकल्पित उद्योगधंद्यांत कच्च्या लोखंडाचा कारखाना, घड्याळें, सायकलींच्या टायर्स, ट्यूब्स, इत्यादि माल तयार करणारे मध्यम व छोटे कारखाने आहेत.

## मुंबई ते लंडन प्रवास तीन तासांत

ब्रिटनच्या बी. ओ. ए. सी. विमान कंपनीचे मॅनेजर मि. ओ. सी. कोचरेम ह्यांचें मुंबई हवाई प्रवासाविषयीं भाषण झालें. रोटरी क्लबांत ह्या विषयावर बोलतांना ते म्हणाले कीं, हवाई वहातूक व प्रवासाचा विकास अतिशय झपाट्यानें होत आहे. त्यामुळें विमानें चालविणाऱ्या लोकांच्या शिक्षणक्रमांत फार मोठे बदल करणें अगत्याचें झालें आहे. आवाजाच्या गतीपेक्षाहि अधिक वेगानें जाणारीं विमानें लवकरच वापरलीं जाण्याची शक्यता आहे. तसें झाल्यास हवाई वहातुकीचें नवीन युगच सुरू होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं. आवाजापेक्षा अधिक गतीनें जाणारें विमान वापरांत आल्यास लंडन ते मुंबई हा प्रवास अवघ्या दोन ते तीन तासांत होऊं शकेल.

---

## जपानी तज्ज्ञांसाठी शेतीचें शिक्षण

जपान व भारत ह्यांच्यांत झालेल्या तांत्रिक मदतीच्या कराराप्रमाणें जपान भारतांत चार नमुनेदार शेतें स्थापन करणार आहे. पश्चिम बंगाल, ओरिसा, बिहार आणि गुजरात ह्या राज्यांतून तीं स्थापन करण्यांत येतील. ह्या शेतावर काम करून शिकविण्यासाठी १२ जपानी शेतीतज्ज्ञांना खास शिक्षण देण्यांत येत आहे. प्रत्येक शेताचा विस्तार सुमारें २० एकर असेल आणि त्यावर ४ जपानी तज्ज्ञ काम करतील. ४ जपानी तज्ज्ञ ह्यापूर्वींच भारतांत आलेले आहेत.

---

## ब्रिटनमधील जुगारी प्रवृत्ति

१९६१ सालीं ब्रिटनमधील लोकांनीं ७६ कोटी पौंड जुगारासारख्या अनेक प्रकारांत खर्च केले. १९६० सालापेक्षा ही रक्कम ८ कोटी पौंडांनीं अधिक आहे. १९६१ सालीं घोड्यांच्या शर्यतीवर लावलेली रक्कम ४४ कोटी पौंड होती. ही रक्कम १९६० च्या मानानें ५·५ कोटी पौंडांनीं अधिक आहे. इंग्लंडच्या चर्चेस कौन्सिलनें जुगारासंबंधीं चौकशी करून अहवाल प्रसिद्ध केला; त्यांत ही माहिती देण्यांत आली आहे.

---

## प्रेसिडेंट केनेडी ह्यांच्या टेबलावर १९ फोन

अमेरिकेचे अध्यक्ष केनेडी ह्यांना जागतिक पुढाऱ्यांशीं जरूर पडल्यास ताबडतोब बोलतां यावें म्हणून खास सोय करण्यांत आलेली आहे. त्यांच्या टेलिफोनच्या टेबलावर १८ टेलिफोन्स असून बटन दाबतांच ते ब्रिटनचे पंतप्रधान, फ्रान्सचे अध्यक्ष, ह्यासारख्या राज्यप्रमुखांशीं बोलूं शकतात. परंतु त्यांना रशिआचे पंतप्रधान क्रुश्चेव्ह ह्यांच्याशीं बोलावयाचें झाल्यास अशी सोय उपलब्ध नाहीं. लवकरच त्यांच्या टेबलावर १९ वा फोन बसविण्यांत येणार आहे. अमेरिका अगर रशिआ ह्यांपैकीं कोणीहि चुकीनें अणुयुद्ध सुरू केल्यास ह्या नव्या टेलिफोनचा फार उपयोग होईल.

---

## हस्तव्यवसायाच्या मालाचें विक्रीकेंद्र

मद्रास राज्य हस्तव्यवसाय सहकारी सोसायटीनें दिल्ली येथें आपल्या मालाची विक्री करण्यासाठी एक केंद्र उघडण्याचें ठरविलें आहे. मद्रास राज्यांत तयार होणारा कलाकुसरीचा खास माल केंद्रांत ठेवण्यांत येणार आहे. या मालांत बाहुल्या, हस्तीदंताच्या वस्तु, मिन्याचें काम केलेल्या धातूच्या वस्तु, इत्यादि माल असेल. अशीच विक्री-केंद्रें मुंबई व कलकत्त्याला खोलण्याचा मद्रास सरकारचा विचार आहे.



भारत फोर्ज कंपनी लि. कल्याण, चे एक डायरेक्टर श्री. नीलकंठराव आण्णाप्पा कल्याणी हे ता. ६ एप्रिल रोजीं कंपनीच्या कामासाठीं अमेरिकेस रवाना झाले होते. त्यांनीं ता. १२ रोजीं क्लीव्हलँड येथें स्टील इंप्रूव्हमेंट ॲण्ड फोर्ज कंपनी लि. शीं तांत्रिक साहाय्याचा करार पुरा केला. या करारावर श्री. कल्याणी व स्टील इंप्रूव्हमेंटचे श्री. एच. स्मिथ सह्या करीत असल्याचें छायाचित्रांत दिसत आहे.

### कंपन्यांनीं डिव्हिडंड देण्यापूर्वी घसाऱ्याची तरतूद केली पाहिजे

सन १९५६ च्या कंपनी कायद्याच्या २०५ व ३५० कलमांत नमूद केलेल्या पद्धतीप्रमाणें आपल्या स्थावर मालमत्तेच्या बाबतींत घसाऱ्याची कांहींहि तरतूद न करतां, कांहीं कंपन्या डिव्हिडंड जाहीर करतात व तो वाटतात ही गोष्ट भारत सरकारच्या निदर्शनास आणून देण्यांत आलेली आहे. तथापि सदर कायद्यांतील २०५ कलमान्वयें वरील बाबींसाठीं घसाऱ्याची तरतूद करण्याचा स्पष्ट आदेश देण्यांत आलेला असून डिव्हिडंड जाहीर करण्यापूर्वी त्याचें प्रत्येक कंपनीनें काटेकोरपणें पालन केलें पाहिजे ही गोष्ट कंपन्यांच्या लक्षांत आणून देण्यांत येत आहे.

स्थावर मालमत्तेच्या घसाऱ्याची योग्य ती तरतूद केल्यावांचून एखाद्या कंपनीनें कोणत्याहि आर्थिक वर्षासाठीं डिव्हिडंड जाहीर करून तो दिल्यास त्याबाबतची सर्व जोखीम त्या कंपनीवरच राहील व कंपनी कायद्यांतील ६२९ ए कलमांत दिलेल्या शिक्षेस ती पात्र ठरेल.

### विजेच्या यंत्रसामग्रीचे खाजगी कारखाने

विजेची भारी यंत्रसामग्री खाजगी कारखान्यामार्फत तयार करवून घेण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत अशा प्रकारच्या सार्वजनिक मालकीच्या कारखान्यांतून ९० कोटी रुपयांची यंत्रसामग्री तयार होईल. यंत्रसामग्रीचा भोपाळ येथील कारखाना सुरू झालेला असून आणखी दोन कारखाने काढण्यांत येणार आहेत. ह्या सार्वजनिक मालकीच्या कारखान्यांचें उत्पादन जमेस धरूनहि उत्पादनास आणखी वाव आहे. म्हणून कांहीं खाजगी मालकीच्या कारखान्यांना जरूर तो परवाना देण्याचा विचार सरकारतर्फे चालू आहे. अशा प्रकारची यंत्रसामग्री आणून बरीचशी आयात करण्यांत येते.

### संपत्तीचा त्याग करून मिशनरी होणार!

मॉरिस कर्टिस ह्या इंग्लंडमधील एका धनाढ्य कंपनी डायरेक्टरानें आपला व्यवसाय बंद करून आणि रहातें घर विकून टाकून भारतांत मिशनरी होण्याचें ठरविलें आहे. चर्च मिशनरी सोसायटीच्या तीन महिन्यांचा अभ्यासक्रम संपविल्यानंतर तो भारतांत येईल.

मिशनरी होण्यास त्याचें शिक्षण आधीं घ्यावें लागतें, ही गोष्ट लक्षांत येईल. पण महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, श्रीमंत मनुष्य ऐहिक सुखाचा त्याग करून गरिबी पत्करण्यास जसा तयार होतो, तसा ज्याची अद्याप कधींच भूक भागलेली नाहीं, असा मध्यमवर्गीय होऊं शकत नाहीं. संपत्तीचा वीट आला म्हणजे मानवता अधिक प्रकर्षानें आठवते!

### भुइमुगाच्या पिठाचा उपयोग

भुइमूगाच्या पिठाचें मिश्रण करून तयार केलेला पौष्टिक आटा बनविण्याचे दोन कारखाने चालू वर्षी सुरू करण्यांत येणार आहेत. त्यांपैकीं एक मुंबईत व दुसरा कोईमतूर येथें निघेल. लोकांच्या आहारांतील प्रथिनें वाढविण्यासाठीं हा उपक्रम करण्यांत येत आहे.


## DECCAN INSTITUTE OF COMMERCE

717 Budhwar Peth, Opp. Jijamata Garden, Poona 2.

**Opens for the New Year on MONDAY, 18th JUNE 1962**

Students coached up for the G. C. D, D. Com., G. D. C. and A., Costing, Company Secretary, External Pre-Degree Commerce and B. Com. Degree, Shorthand and Typewriting Courses.

★ Last batch of One Year's G. C. D. Course.
★ Govt. Freeships for G. C. D. and G. D. C. and A. Courses to students having annual income of less than Rs. 1200/-
★ Morning & Evening Classes.

## Fergusson College, Poona 4.

The College will open for the new year on the 20th June 1962. Prospectus and application forms for admission will be available in the college office between 12 noon and 4-00 p. m. on working days.

D/-26-5-1962. **Principal.**

D. E. Society's

## Brihan Maharashtra College of Commerce

POONA 4.

The College will re-open on 20th June 1962 for the academic year 1962-63. Students seeking admission to Pre-degree, F. Y., S. Y., and T. Y. B. Com. Classes should apply immediately. Forms of admission and copies of the prospectus are available in the College Office between 11 a. m. and 2 p. m. on all working days.

—*Principal.*


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.